अहवाल

**महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मृतिदिना निमित्त विन्रम अभिवादन करण्यात आले.**

दि. 06 डिसेंबर, 2024 रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन व प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मृतिदिना निमित्त कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालया मध्ये राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या वतीने प्रा. एन.बी.टीबे व श्री. धनंजय बिचकर यांच्या हस्ते विन्रम अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नितीन शिंदे, उपप्राचार्य प्रा.डॉ. पी. व्ही. गायकवाड, प्रा. डॉ. संदीप पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.संतोष पाटील, सुपरवायझर प्रा. मिलिंद खंडेलोटे, प्रा.डॉ. संतोष खडसे, प्रा.एकनाथ पाटील, प्रा. डॉ. राजेश दांडगे, प्रा.डॉ.एस.के.माने उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रकाश आठवले, प्रा. संदिप पाटील तसेच ग्रंथपाल अभयकुमार पाटील, श्री संदिप पाटील, सागर रणदिवे यांनी याचे संयोजन केले होते.



प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com



इस्लामपूर : केबीपी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात जगन्नाथ नांगरे यांनी क्रांतिगीत सादर केले

## डॉ. आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील समाजाचे महानायक : चर्चासत्रातील सूर

**इस्लामपूर :** भारताच्या इतिहासात परकीय आणि स्वकीयांच्या गुलामगिरीतून समाज शोषणमुक्त करण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसिंह नाना पाटील या दोन्ही महापुरुषांनी महान योगदान दिले, असे मत येथील महात्मा फुले शिक्षणसंस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात आयोजित चर्चासत्रात मान्यवरांनी व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त पदवी व पदव्युत्तर इतिहास विभागातर्फे आयोजित चर्चासत्रात अभिवादन करण्यात आले. चर्चासत्रात प्रा. मनीषा पाटील, डॉ. संतोष खडसे, डॉ. राजेश दांडगे, डॉ. प्रकाश आठवले, प्रा. एस. आर. गरुड, विशाल कांबळे, श्रेणिका थोरात यांनी सहभाग घेतला. जगन्नाथ नांगरे यांच्या क्रांतिकारी गीत गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आकांक्षा जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रतिभा जाधव यांनी आभार मानले.

Sangli Edition
Dec 08, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

# पुण्य नगरी



इस्लामपूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन करताना धनंजय बीचकर व प्रा. एन. बी. टिबे.

## केबीपीमध्ये डॉ. बाबासाहेब, क्रांतिसिंहांना अभिवादन

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

येथील म. फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मृती दिवसानिमित्त त्यांच्या प्रतिमांना धनंजय बीचकर आणि प्रा. एन. बी. टिबे यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. स्मिता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी . व्ही. गायकवाड, प्रा. संतोष पाटील, विनायक गुरव, कर्मचारी उपस्थित होते.

Sangli Edition
Dec 09, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com